**नियमित दिवाणी दावा क्र. ६५/२०२५**
**पमाबाई विरुद्ध गणपती**

## नि.क्र. ४४ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रस्तुतच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. १७ व २८ हे मयत झाले असून त्यांचे मृत्यूनंतर विहीत मुदतीमध्ये वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने अबेटमेंटचा हुकूम सेट असाईड होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द डिक्लरेशनसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी क्र. १७ व २८ यांना नोटीस काढली असता प्रतिवादी क्र. १७ व २८ हे मयत असल्याचा बेलिफ रिपोर्ट आहे. त्यावेळी वादी यांनी चौकशी केली असता यातील प्रतिवादी क्र. १७ हे दि. १६.०९.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र. २८ हे दि. १४.१०.२०२४ रोजी मयत झालेले आहेत असे समजले. वादी या अशिक्षीत असल्याने, महिला असल्याने, कायद्याचे अज्ञान असल्याने वादी यांना वेळेत वारस रेकॉर्डवर घेता आले नाही. मयताचे वारस दावेकामी रेकॉर्डवर आणायचे असता, त्याबाबतचे ज्ञान वादी यांना नव्हते. त्यामुळे अबेटमेंट सेट असाइड होवून वारस रेकॉर्डवर आणलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र २ ते ७ यांनी त्यांचे म्हणणे नि. ५६ वर सादर केले असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर कामातील प्रतिवादी क्र. १७ व २८ हे दावा दाखल तारेखेपूर्वीच मयत झालेले आहे. थोडक्यात वादी यांनी मयत व्यक्तींच्या विरुध्द दावा दाखल केला आहे. अशा परिस्थीतीत प्रस्तूतचे अर्ज चालण्यास पात्र

नाहीत. सबब सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. सदर अर्जास इतर प्रतिवादींनी म्हणणे दाखल केले नाही. सबब प्रस्तूत अर्ज प्रतिवादी यांचे विरुध्द विना म्हणणे चालवण्यात आला.

४. वादीने प्रस्तुतचा दावा हा डिक्लेरेशनसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, सदरच्या दाव्यात वादी–प्रतिवादीचे स्थावर मिळकतीबाबतचे हक्क व अधिकारांशी निगडीत आहे. मयत प्रतिवादींचे वारस यापूर्वीच प्रतिवादींच्या कक्षेत दाव्यात समाविष्ट आहेत. त्यामुळे अर्जातील कारण विचारात घेता न्यायदानाच्या दृष्टीने प्रस्तुतचा दावा गुणदोशावर निकाली काढण्याकामी मयत प्रतिवादी विरूध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणे अत्यंत आवश्यक आहे. यापूर्वी विलंब माफ करण्याच्या अर्जावर खर्च देण्याचा आदेश झालेला असल्यामुळे या अर्जासाठी वेगळा खर्च लावण्याची आवश्यकता दिसून येत नाही. सबब खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. ४४ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी विरुद्ध झालेला अबेटमेंट आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी विहीत मुदतीमध्ये आवश्यक ती पूर्तता करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.02.18 10:52:17 +0530

**कवठे महांकाळ.**
**दिनांकः– १७.०२.२०२६**

**(एम.ए.कुलकर्णी)**
**सह दिवाणी न्यायाधीश क स्तर**
**कवठे महांकाळ.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 23.01.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 23.01.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 23.01.2026 |